# महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परिक्षा मंडळ,

**१३२/ब, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद इमारत, भांबुर्डा, पुणे-४११ ००७**

**दुरध्वनी क्र. ०२०-२५५२८५१९/११९ ई-मेल: cetmauebpune@gmail.com**


## निवेदन - १

**(PG-CET-2026)**

महाराष्ट्रातील चारही कृषि विद्यापीठातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परिक्षा मंडळामार्फत **सामाईक प्रवेश परीक्षा-२०२६ (PG-CET-2026)** माहे एप्रिल, २०२६ मध्ये घेण्याचे नियोजित आहे. त्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्याची प्रक्रिया **दि.२९.१.२०२६ ते २३.२.२०२६** या कालावधीत होणार आहे. प्रवेश घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेच्या **www.mcaer.org** या संकेतस्थळावर उपलब्ध लिंक मार्फत ऑनलाईन अर्ज भरावेत.

स्थळ: पुणे
दिनांक: २८.०१.२०२६

स्वाक्षरीत/-
**नियंत्रक**
**महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परिक्षा मंडळ, पुणे**


# Maharashtra Agricultural Universities Examination Board

**MCAER Building, Bhamburda, Pune - 411 007**

**Phone No. 020-25528519/119 E-mail: cetmauebpune@gmail.com**


## NOTIFICATION-1

**(PG-CET-2026)**

Online applications are invited by the Maharashtra Agricultural Universities Examination Board, Pune, for the **Common Entrance Test (PG-CET-2026)** towards admission to **Master's Degree Programmes** to be commenced during the Academic Year, 2026-27 in various agricultural disciplines at the Maharashtra State Agricultural Universities. The online application process shall commence from **29.01.2026** and the last date for submission of online applications shall be **23.02.2026**. Eligible candidates are advised to visit the website **www.mcaer.org** for detailed information and instructions.

Place: Pune
Date: 28.01.2026

*sd/-*
**Controller**
**Maharashtra Agricultural Universities Examination Board, Pune**

[जा.क्र. मकृविपमं/पसाप्रप-२०२६/जाहिरात/४५८/२६; दिनांक: २३/०१/२०२६]

# MAHARASHTRA AGRICULTURAL UNIVERSITIES EXAMINATION BOARD
## महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ

MCAER Building, 132/B, Bhosalenagar, Pune – 411007

020-25528519/119https://www.mcaer.org/maueb.htmlE-mail: mauebpune@yahoo.co.in


Date: 23/01/2026

No. MAUEB/PG-CET-2026/**460**/26

## प्रसिध्दीसाठी बातमी - १

## [PG-CET-2026]

महाराष्ट्रातील चारही कृषि विद्यापीठांमध्ये उपलब्ध असणाऱ्या विविध विद्याशाखांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी **पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सामाईक प्रवेश परीक्षा-२०२६ (PG-CET-2026) महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे** यांचे मार्फत माहे एप्रिल, २०२६ मध्ये महाराष्ट्रातील विविध केंद्रांवर आयोजित करण्यात येत आहे.

सदर परीक्षेसाठी संबंधित विद्याशाखेचे पदवी अभ्यासक्रमाचे पदवीधर तसेच, सन २०२५-२६ याशैक्षणिक वर्षाच्या अंतिम सत्रांत परीक्षेस बसणारे विद्यार्थी पात्र राहातील. सदर परीक्षेसाठी विहित नमुन्यातील अर्ज महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे **http://www.mcaer.org** या संकेतस्थळावर उमेदवाराने स्वत: भरावयाचे आहे. अर्ज भरण्यापूर्वी संपूर्ण माहिती पुस्तिका काळजीपूर्वक वाचणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी **दि.२९.१.२०२६ ते २३.२.२०२६** असा राहील.

ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर परिक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने नेट बँकीग/युपीआय/डेबिट/क्रेडीट कार्डव्दारे **दि. २९.१.२०२६ ते दि. २४.२.२०२६ (दुपारी ३:००)** पर्यंत स्वीकारले जाईल. ह्या परिक्षेसंबंधित अर्ज महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांच्या कार्यालयाकडे पाठविण्याची आवश्यकता नाही.

संभाव्य पात्र उमेदवारांची यादी दिनांक **२७.२.२०२६** रोजी वरील नमुद संकेतस्थळावर उपलब्ध होईल. **दि.२७.२.२०२६ ते ५.३.२०२६** या कालावधीत अर्जाबाबतच्या तक्रारींचे निवारण करण्यात येईल. त्यानंतर पात्र उमेदवाराची यादी संभाव्यत: **दि.१७.३.२०२६** रोजी वरिल संकेतस्थळावर उपलब्ध होईल. उमेदवारांनी आपले **परीक्षा प्रवेश पत्र** (Admit Card) डाऊनलोड करावयाची दिनांक वरील संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

सदर सामाईक प्रवेश परीक्षेचा संभाव्य दिनांक, उत्तरतालिका व परीक्षेचा निकाल प्रसिध्द करावयाचा कालावधी वेळोवेळी **http://www.mcaer.org** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच, सदर परीक्षेच्या वेळापत्रकात काही बदल झाल्यास तसे संकेतस्थळावर अधिसुचित करण्यात येईल. या परिक्षेसंदर्भात अधिक माहितीसाठी ०२०-२५५२८५१९/११९ या दूरध्वनी क्रमाकांवर संपर्क साधावा किंवा **cetmauebpune@gmail.com** या ईमेल वर कळवावे, असे नियंत्रक, महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांचे कार्यालयाव्दारे कळविण्यात आलेले आहे.

स्थळ : पुणे-७
दिनांक :२३.१.२०२६

**नियंत्रक**
**महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ,**
**पुणे**